नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७२ Issue - 272 | वार शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ Blow- Saturday Date 21 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ट्रम्प टॅरिफचा निर्णय बेकायदेशीर

## अधिकार वापरताना मर्यादा ओलांडल्याचा अमेरिकन सुप्रिम कोर्टाचा ठपका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिंग्टन : अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानं शुक्रवारी डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का दिला आहे. सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून दुसऱ्या देशांवर लादण्यात येत असलेले टॅरिफ बेकायदेशीर ठरवण्यात आले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर टॅरिफ लादताना त्यांच्या अधिकारांच्या मर्यादांचं उल्लंघन केल्याचं सुप्रीम कोर्टानं म्हलं. या निर्णयातील माहितीनुसार राष्ट्रीय आपत्कालीन स्थितीत लागू करण्यात येणाऱ्या कायद्याचा वापर करत ट्रम्प यांनी टॅरिफ लादले.

अमेरिकेच्या संविधानानुसार कर आणि टॅरिफ लादण्याचा अधिकार राष्ट्रपतींना नसून काँग्रेस म्हणजेच संसदेला मिळालेला आहे. मात्र, ट्रम्प यांनी टॅरिफला एक आर्थिक आणि विदेशी धोरणासाठी ढाल म्हणून वापरलं. ट्रम्प यांनी हे निर्णय अमेरिकेच्या आर्थिक सुरक्षेसाठी महत्त्वाचे असल्याचं म्हटलं होतं. टॅरिफ शिवाय अमेरिका उद्धवस्त होईल, असं ट्रम्प म्हणाले होते.

अमेरिकन सुप्रीम कोर्टाचा ट्रम्प यांना धक्का

ट्रम्प यांचे टॅरिफ लावण्याचे निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून अवैध ठरवण्यात आले आहेत. शांततेच्या काळात टॅरिफ लावण्याचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या काँग्रेसकडे असल्याचं अमेरिकन सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने आज डोनाल्ड ट्रम्प जागतिक टॅरिफ संदर्भात महत्त्वाचा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ६-३ बहुमताने (६ विरुद्ध ३) ट्रम्प यांच्या अनेक टॅरिफला अवैध ठरवले आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की, ट्रम्प यांनी खपींशीपरींळेपरश्र एशीसशप- लू एलेपोळल झेशीी लीं (खएएझ) या १९७७ च्या कायद्याचा वापर करून राष्ट्राध्यक्ष म्हणून एकतर्फीपणे व्यापक टॅरिफ लावण्याचा अधिकार अमर्यादपणे वापरला आहे. मुख्य न्यायमूर्ती जॉन रॉबर्ट्स यांनी बहुमताचा निर्णय लिहिला. त्यात म्हटले आहे की, शांततेच्या काळात टॅरिफ लावण्याचा अधिकार फक्त अमेरिकेच्या काँग्रेसकडे (सभागृहाकडे) आहे.

राष्ट्राध्यक्षांना अशा मोठ्या अधिकारासाठी काँग्रेसची परवानगी आवश्यक असते.निर्णयात म्हटले आहे की कायद्याने राष्ट्रपतीला टॅरिफ लावण्याचा अधिकार दिलेला नाही.ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील आर्थिक धोरणातील एक मोठा धक्का समजला जातोय. सर्वोच्च न्यायालयात ६ विरुद्ध ३ च्या बहुमताने निर्णय झाला आहे. हे टॅरिफ अनेक देशांवर जागतिक स्तरावर लागू केले गेले होते, ज्यामुळे अमेरिकन आयातदारांना अब्जावधी डॉलर्स दंड भरावा लागला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे काही टॅरिफ रद्द होऊ शकतात आणि आयातदारांना रिफंड मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन सुप्रीम कोर्टाचा टॅरिफ संदर्भातील निर्णय अपमानास्पद असल्याचं म्हटलं. याशिवाय प्लॅन बी देखील तयार असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

## मुस्लिम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द, शासन निर्णयाविरोधता मुंबई उच्च न्यायालयात याचिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुस्लिम समाजाला देण्यात आलेलं आरक्षण रद्द करण्याच्या शासन निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. अॅड एजाझ नक्वी यांनी याचिका दाखल केली आहे. शासनाचा निर्णय रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. अचानक असं काय झाल की राज्य सरकारने शैक्षणिक संस्थांमधील मुस्लिम समाजाला दिलेल पाच टक्के आरक्षण रद्द केलं? असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.



सोमवारी मुंबई उच्च न्यायालयासमोर याचिका मेंशन करुन लवकर सुनावणीची मागणी करण्यात येणार आहे. मंगळवारी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय काढून शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी तसेच निमसरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देण्याच्या २०१४ चा शासन निर्णय रद्द केला होता.

मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द

मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलं आहे. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. या घटनेनंतर राज्यातील वातावरण चांगलच तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबाबत समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. भाजप सरकार मुस्लिमांच्या विरोधात काम करत असल्याचे मत आझमी यांनी व्यक्त केले. कायदा रद्द केला असं सरकार म्हणत आहे, पण कायदा बनलाच नव्हता, समाजाची दिशाभूल केली जात असल्याचे आझमी म्हणाले.

शासन निर्णयात मुस्लिम समाजाला देण्यात आलेले २३ डिसेंबर २०१४ रोजीचे आरक्षण रद्द झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. आरक्षण रद्द झाल्यानंतरही राबवली जाणारी जात प्रमाणपत्र वितरण आणि वैधता प्रक्रियेला शासनाकडून ब्रेक लावण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर, आगामी विधानसभा निवडणुकांकडे लक्ष ठेवून असलेल्या महाराष्ट्र सरकारने मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. सरकारने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठ्यांना १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. यामुळे राज्यातील एकूण आरक्षण ७३ टक्के झाले होते. राज्याचे अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

## मंत्रालयानंतर बीडमध्ये एसीबी ची धाड, लाचखोर तहसीलदार व्यंकटेश मुंडे अडकला जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार थेट मंत्रालयापर्यंत पोहोचला असून एसीबीच्या छाप्यात हा उघड झाल्याचं अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपिकाला लाच घेताना रंगेहात पडकल्याची घटना ताजी असतानाचा, मुंबईतील मुलूंड येथे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यासही एबीसीने अटक केली आहे. आता, बीड जिल्ह्यातील परळीतून लाचप्रकरणाची मोठी घटना समोर आली असून चक्क तहसीलदारच जाळ्यात अडकला आहे.

परळीतील तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे लाच प्रकरणात अडकल्याची घटना समोर आली आहे. तक्रारदारास सालन्सी प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी पन्नास हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती वीस हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र, तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने रंगेहात पकडण्यासाठी सापळा रचला होता. मात्र, तक्रारदाराच्या हालचालीवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले. तरीही एसीबीने आवश्यक ते सर्व पुरावे संकलित करून व्यंकटेश मुंडे यांना ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. तर गेल्या काही दिवसांत एसीबीच्या वाढत्या छाप्यांमुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, अद्यापही सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांचे काम करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याचं भीषण वास्तव आहे.




## देशाच्या तिजोरीत आत्तापर्यंतची विक्रमी वाढ, केंद्रीय बँकेने जाहीर केली आकडेवारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाच्या परकीय चलन साठ्याने आतापर्यंतचा उच्चांक गाठला आहे. शुक्रवारी रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, १३ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताच्या परकीय चलन साठ्यात ८.६६ अब्ज डॉलर्सची वाढ होऊन तो ७२५.७२७ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे, जो आतापर्यंतचा उच्चांक आहे.

६ फेब्रुवारी रोजी संपलेल्या मागील आठवड्यात एकूण परकीय चलन साठा ७१७.०६४ अब्ज डॉलर्सवर घसरला. जानेवारीमध्ये परकीय चलन साठा ७२३.७७४ अब्ज डॉलर्सच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला होता. केंद्रीय बँकेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार १३ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय चलन मालमत्ता ३.५५ अब्ज डॉलर्सने वाढून ५७३.६०३ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे.

आरबीआयने म्हटले आहे की भारताच्या परकीय चलन साठ्यात सुमारे ९६ टक्के आयात आणि सुमारे एक वर्षासाठी थकीत बाह्य कर्ज भरुन काढता येईल इतके आहे. जरी परकीय चलन मालमत्ता भारताच्या परकीय चलन साठ्याचा सर्वात मोठा घटक असला तरी, मूल्यांकन परिणामांमुळे परकीय चलन साठ्यात सोन्याचा वाटा ६ फेब्रुवारी २०२६ रोजी डिसेंबर अखेरच्या पातळीपेक्षा वाढला. आरबीआय गरज पडल्यास परकीय चलन बाजारात हस्तक्षेप करते. यासाठी, ते डॉलर्स विकते किंवा खरेदी करते जेणेकरून रुपयातील तीव्र चढउतार थांबवता येतील. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की हा हस्तक्षेप कोणताही विशिष्ट दर निश्चित करण्यासाठी नाही तर बाजार स्थिर ठेवण्यासाठी केला जातो.

सोन्याच्या राखीव मूल्यात वाढ

गेल्या आठवड्यात सोन्याच्या राखीव मूल्यात घट झाली असली तरी, या आठवड्यात ती पुन्हा वाढली आहे. आरबीआयने म्हटले आहे की सोन्याच्या राखीव मूल्याचे मूल्य या आठवड्यात ४.९९ अब्ज डॉलर्सने वाढून १२८.४६६ अब्ज डॉलर्स झाले आहे. केंद्रीय बँकेने म्हटले आहे की परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूक आणि भारतीय रुपयात सुधारणा झाली आहे, जी भारत-ईयू मुक्त व्यापार करार आणि अंतरिम भारत-अमेरिका व्यापार करारानंतर गुंतवणूकदारांच्या भावनांमध्ये बदल दर्शवते.

दर आठवड्याला डेटा येतो

भारतातील परकीय चलन साठ्याचा डेटा दर आठवड्याला जारी केला जातो. दर शुक्रवारी संध्याकाळी आरबीआयकडून हा डेटा जारी केला जातो. त्यात मागील आठवड्यापर्यंतचा डेटा आहे. म्हणजेच, डेटा एका आठवड्याच्या विलंबाने येतो. त्यात चार गोष्टींबद्दल माहिती आहे, जसे की परकीय चलन मालमत्ता, सोन्याचे साठे, विशेष रेखांकन अधिकार आणि खचक्र मध्ये ठेवलेली राखीव स्थिती.

### केंद्रप्रमुखाच्या तक्रारीनंतर पोलीस कारवाई

## दहावीच्या परीक्षेला तरुणीसह १० तोतया विद्यार्थी; मंगळवेढ्यातील प्रकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: राज्यात आजपासून एसएससी १० वी बोर्डाच्या परीक्षा आजपासून सुरू झाल्या असून अनेक ठिकाणी कॉपीच्या घटना उघडकीस आल्याने शासनाच्या कॉपीमुक्त अभियानास हरताळ फासण्यात आला आहे. भरारी पथकाकडून परीक्षा केंद्रावरील कॉपी प्रकरणावरुन विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली. मात्र, सोलापूर जिल्ह्याच्या मंगळवेढ्यात वेगळाच प्रकार समोर आला आहे. येथे दहावीच्या परीक्षेत मराठी पेपरला मंगळवेढा तालुक्यात आढळले चक्क १० तोतया विद्यार्थी आढळून आले आहेत. या तोतया विद्यार्थ्यांवर केंद्रप्रमुखांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी कारवाई केली आहे.



मंगळवेढा तालुक्यातील बाळकृष्ण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नंदेश्वर येथे आज दहावीच्या परीक्षेत चक्क १० तोतया विद्यार्थी आढळून आले आहेत. त्यामध्ये नऊ विद्यार्थी व एका विद्यार्थिनीचा समावेश आहे. मंगळवेढ्यातीलच सुतार इंटरनॅशनल स्कूल लक्ष्मी दहिवडी या शाळेतील विद्यार्थी नंदेश्वर येथील बाळकृष्ण विद्यालयात परीक्षेसाठी होते.

परीक्षा सुरू करताना सर्व विद्यार्थ्यांची ओळखपत्र तपासणी दरम्यान दहा तोतया विद्यार्थी आढळून आले आहेत. या दहा विद्यार्थ्यांवर केंद्र प्रमुखांनी बोर्डाच्या नियमानुसार कारवाई करीत रीतसर पोलीस तक्रार दिली आहे, अशी माहिती केंद्रसंचालक विठ्ठल एकमल्ली यांनी दिली.

मृत ग्रामसेवकाचे नाव १० वी परीक्षेच्या गलथान पथकात

बीडमध्ये दहावी आणि बारावीच्या सुरू असलेल्या परीक्षे दरम्यान शिक्षण विभागाचा गलथान कारभार वारंवार समोर येतोय. २०२१ साली आजारपणामुळे निधन झालेल्या ग्रामसेवक अरविंद आगलावे यांच्यावर बैठे पथकाची जबाबदारी देण्यात आली. गटशिक्षण अधिकारी समंदरखान यांनी याबाबतची ऑर्डर इश्यू केली आहे. मात्र, या बैठे पथकात पाच वर्षांपूर्वी निधन झालेल्या ग्राम सेवकाचे नाव आल्यानं शिक्षण विभागाबाबत आश्चर्य आणि प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातंय. गटशिक्षण अधिकारी समंदर खान यांनी फोनवर नेहमीप्रमाणे उतर देत पंचायत समितीकडे बोट दाखवले. पंचायत समितीच्या माध्यमातून या नावाची यादी आली होती. त्यामुळे हा प्रकार झाल्याचं त्यांनी मान्य केलं. परंतु दहावी आणि बारावीच्या परीक्षा बाबत शिक्षण विभागाचा हलगर्जीपणा वारंवार समोर येतोय. एकीकडे बीड जिल्ह्यात कॉपीच्या घटनांमुळे परीक्षा चर्चेत असताना आता हा नवीनच प्रकार समोर आल्याने पुन्हा नाचक्की होत आहे.

## ट्रम्प यांचे टॅरिफ वॉर संपुष्टात, शेअर बाजारात आनंदी आनंद गडे; गुंतवणूकदारांचा जोश हाय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रमुख टॅरिफ धोरणाला रद्द ठरवल्यानंतर शुक्रवारी वॉल स्ट्रीटमध्ये वाढ झाली. मंदावलेली वाढ आणि सततच्या चलनवाढीच्या नवीन लक्षणांमुळे बाजाराला झालेला हा कायदेशीर धक्का भरून निघाला.

डाऊ जोन्स इंडस्ट्रियल सरासरी २०१ अंकांनी किंवा ०.०४ टक्क्यांनी वाढली. एस अँड पी ५०००.४ टक्क्यांनी वाढला, तर नॅस्डॅक कंपोझिट ०.५ टक्क्यांनी वाढला, ज्याला अल्फाबेटच्या शेअर्समध्ये २ टक्क्यांनी वाढ झाली. सत्राच्या सुरुवातीला प्रमुख सरासरी घसरली होती परंतु आयात शुल्काला आधार देणारा कायदा 'राष्ट्रपतींना टॅरिफ लादण्याचा अधिकार देत नाही' असा निर्णय दिल्यानंतर ते बदलले. या निर्णयाने प्रशासनाच्या व्यापक टॅरिफ फ्रेमवर्कला प्रभावीपणे दूर केले, ज्यामुळे व्यापारातील व्यत्यय आणि इनपुट खर्चाबद्दल कंपन्यांच्या चिंता कमी झाल्या. व्यापाऱ्यांनी या निर्णयाला कॉर्पोरेट मार्जिन आणि जागतिक पुरवठा साखळींसाठी संभाव्य दिलासा म्हणून पाहिले. आठवड्याच्या अखेरीस, डाऊ ०.१ % च्या माफक वाढीकडे वाटचाल करत होता. आठवड्यात एस अँड पी ५०००.७% ने वाढले, तर तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचा नॅस्डॅक, जो पाच आठवड्यांचा तोटा कमी करण्याच्या तयारीत होता, तो १% पेक्षा जास्त वाढला.

## संपादकीय....

### आरक्षणावरून याचिका

मुस्लिम समाजाला देण्यात आलेलं आरक्षण रद्द करण्याच्या शासन निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. ॲड एजाझ नक्की यांनी याचिका दाखल केली आहे. शासनाचा निर्णय रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. अचानक असं काय झाल की राज्य सरकारने शैक्षणिक संस्थांमधील मुस्लिम समाजाला दिलेल पाच टक्के आरक्षण रद्द केलं? असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. सोमवारी मुंबई उच्च न्यायालयासमोर याचिका मेंशन करुन लवकर सुनावणीची मागणी करण्यात येणार आहे. मंगळवारी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय काढून शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी तसेच निमसरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देण्याच्या २०१४ चा शासन निर्णय रद्द केला होता. मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलं आहे. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. या घटनेनंतर राज्यातील वातावरण चांगलच तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# शिवजयंतीतून एकतेचा संदेश देणारे अल्ताफ पटेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर जिल्ह्यातील वळसंग या गावातील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते अल्ताफ पटेल हे नाव आज पंचक्रोशीत आदराने घेतले जाते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारे आणि सामाजिक कार्यातून लोकांना जोडणारे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजेच अल्ताफ पटेल.

पत्रकारितेतील अभ्यासू वाटचाल

गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी पत्रकार म्हणून काम करताना केवळ बातम्या दिल्या नाहीत, तर त्या मागील वास्तव समजून घेऊन समाजासमोर मांडले. स्थानिक प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, युवकांचे प्रश्न, शैक्षणिक आणि सामाजिक घडामोडी-प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करून ते आपली भूमिका मांडतात.

त्यांच्या लेखनात प्रामाणिकपणा, स्पष्टता आणि जबाबदारीची जाणीव दिसून येते. त्यामुळेच पंचक्रोशीत त्यांचा मोठा संपर्क आणि विश्वास निर्माण झाला आहे.

शिवजयंती-एकतेचा उत्सव

अल्ताफ पटेल यांची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणजे गेल्या १५ वर्षांपासून आपल्या घरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणारी शिवजयंती.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ते हा उत्सव साजरा करतात. परंतु हा उत्सव केवळ परंपरा म्हणून नसून, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यासाठी असतो.

या दिवशी विविध धर्मीय बांधव एकत्र येतात, शिवचरित्राचे वाचन होते, समाजप्रबोधनपर विचार मांडले जातात आणि बंधुभाव वृद्धिंगत केला जातो. त्यांच्या या उपक्रमामुळे गावात सलोखा आणि परस्पर आदराची भावना दृढ झाली आहे.

आजच्या ध्रुवीकरणाच्या वातावरणात एका मुस्लिम कुटुंबात शिवजयंती साजरी होणे हा खऱ्या अर्थाने सामाजिक एकात्मतेचा आदर्श आहे. अल्ताफ पटेल यांनी कृतीतून दाखवून दिले आहे की, महापुरुषांचे विचार हे सर्वांसाठी असतात-धर्माच्या चौकटीत अडकलेले नसतात.

सामाजिक बांधिलकीची जाणीव

पत्रकारितेबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. गावातील उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम, सामाजिक प्रश्नांवर मार्गदर्शन-या सर्व क्षेत्रांत ते पुढाकार घेतात. त्यांचा स्वभाव शांत, समंजस आणि सर्वांना जोडणारा आहे.

अभ्यासू आणि जाणकार व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना समाजात विशेष मान आहे. कोणताही विषय असो, ते समतोल विचार मांडतात आणि संवादातून तोडगा काढण्यावर विश्वास ठेवतात.

एक प्रेरणादायी आदर्श

अल्ताफ पटेल हे केवळ पत्रकार नाहीत, तर सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहेत. शिवजयंतीच्या माध्यमातून त्यांनी दिलेला एकतेचा संदेश आजच्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.



वळसंग गावाचा हा सुपुत्र आपल्या कृतीतून दाखवून देतो की, धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते. एकमेकांच्या संस्कृतीचा आदर आणि परस्पर विश्वास यावरच समाजाची खरी प्रगती अवलंबून असते.

अशा या एकतेच्या दूताला मनापासून सलाम!

**– धोंडपा नंदे,गावगाथा**

## श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ९:३० वाजता स्वराज्याचे संस्थापक', मराठा साम्राज्य निर्मिते, जाणता राजा', प्रजाहित दक्ष राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर पर्यवेक्षक डॉ. पेटकर सर श्री सुरवसे सर श्री सुनील वाडीकर सर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी पियुष जाधव इयत्ता आठवी या विद्यार्थ्याने प्रभावी सुंदर व रुबाबदार आवाजात गारद सादर केले . तसेच संगीत विभागातील वाहीद शेख ,तेजस सुपनावर, श्लोक घाडगे, शिवतेज चितले, सोहम संगपाल या विद्यार्थ्यांनी अतिशय सुमधुर अशा आवाजात तलवार शिवाजीची हे गीत सादर केले . तसेच हर्ष मुगुटराव, वेदांत पवार, वेदांत झाकडे, कुणाल नरवडे, इत्यादी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर भाषणे केली. विद्यालयातील श्री सूत्रावे सर यांनी शिवरायांचे बालपण शिवरायांचे कार्य माता जिजाऊने घडवलेले संस्कार शिवरायांचे जिद्द, आत्मविश्वास चिकाटी, धैर्य, शत्रूंशी कसा लढा दिला व विजय प्राप्त केला गड किल्ले जिंकले याबाबत सविस्तर मनोगत व्यक्त केले, श्री सुरवसे सर यांनीही मार्गदर्शन पर भाषण केले . विद्यालयाचे प्राचार्य आदरणीय श्री घोडके सर यांनीही विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायक विचार, कार्य, शिस्त, त्यांनी स्वराज्यासाठी आखलेल्या विविध योजना, संरक्षण, जल स्त्रोत, सर्वधर्मसहिष्णुता, गनिमी कावा याबद्दल विशेष माहिती दिली.

याप्रसंगी विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा मध्ये प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री दिलीप सलगर सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री स्वामी आर. एस. यांनी केले .

# मातृभाषेत बोलतो, तो अडानी कसा???...

## २१ फेब्रुवारी: जागतिक मातृभाषा दिवस विशेष.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देशात राष्ट्रवादाच्या नावाखाली लढणाऱ्या वर्गाला संस्कृत ही केवळ १४ हजार लोकांची मातृभाषा आहे, हे जाणून आश्चर्य वाटेल. डिजिटल युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण अजूनही प्रयत्न केले नाहीत, तर कदाचित २२ अनुसूचित भाषाही त्यांचे अस्तित्व वाचवू शकणार नाहीत. आपल्या मातृभाषेत बोलायला इथले लोक टाळतात, हे भारताचे दुर्दैव आहे. जर कोणी मातृभाषेत बोलले तर त्याला अडाणी समजले जाते, त्याच्या कौशल्याचा अवमान केला जातो. इंग्रजी मानसिकतेने भाषेला सामाजिक स्थितीशी जोडले आहे. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा आपले बंद डोळे उघडणारा संकलित लेख.... संपादक.

आज २१ फेब्रुवारी रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केला जातो. जगभरातील भाषा आणि सांस्कृतिक विविधता जोपासणे आणि त्याबाबत जागरूकता निर्माण करणे, हा या दिवसाचा उद्देश्य आहे. युनेस्कोने दि.१७ नोव्हेंबर १९९९ रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली होती. जगात सुमारे ७ हजार भाषा बोलल्या जातात. भारतातही प्रामुख्याने २२ भाषा बोलल्या जातात. भारतात जवळपास १३००च्या आसपास मातृभाषा आहेत. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या दिवशी जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने शिक्षण आणि साहित्याशी निगडित लोक विविध भाषांबद्दल चर्चा करतात. मातृभाषेबद्दल जागरूकता निर्माण करणे, भाषिक विविधता जोपासणे, त्याचे महत्त्वदेखील अधोरेखित केले जाते. जगात काही मातृभाषा लोप पावत असल्याबद्दलही जागतिक पातळीवर चिंता व्यक्त केली जाते. मातृभाषेचे संवर्धन करणे, मातृभाषेचा प्रचार-प्रसार करण्याबाबत धोरण ठरवले जाते.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान असे दोन भाग होते. पूर्व बांगलादेशमध्ये उर्दू आणि पश्चिम बांगलादेशमध्ये बंगाली भाषिकांचे प्रमाण अधिक होते. तत्कालीन पाकिस्तान सरकारने भाषा धोरण लागू करून पाकिस्तानची अधिकृत भाषा म्हणून उर्दूला मान्यता दिली होती. पाकिस्तान सरकारच्या या धोरणाच्या विरोधात ढाका विद्यापीठात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. ढाका विद्यापीठातील आंदोलनावर पोलिसांनी २१ फेब्रुवारी १९५२ रोजी गोळीबार केला होता. आंदोलनाच्या परिणामी पाकिस्तान सरकारला नमतं घ्यावं लागले आणि बंगाली भाषेलाही मान्यता द्यावी लागली होती.

भाषिक आणि सांस्कृतिक विविधता आणि बहुभाषिकतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी युनेस्कोने सन २०००पासून दरवर्षी २१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा करण्यास सुरुवात केली. हा दिवस साजरा करण्याची कल्पना कॅनडामध्ये राहणारे बांगलादेशी रफीकुल इस्लाम यांनी दिली. बंगाली भाषेचे अस्तित्व टिकवून ठेवणे यासाठीही हा दिवस स्मरणात ठेवला जातो. सन १९५२मध्ये ढाका विद्यापीठातील विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी आंदोलन केले होते. यात मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या स्मरणार्थ युनेस्कोने मातृभाषा दिनासाठी हा दिवस निवडला. वर्ष २०२२साठी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाची थीम बहुभाषिक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर: आव्हाने आणि संधी ही होती. २०२२-२०३२ हे दशक संयुक्त राष्ट्रांकडून देशी भाषांचे आंतरराष्ट्रीय दशक म्हणून साजरे केले जाईल.

लहानपणी ज्या भाषेशी आपला परिचय होतो, ज्या भाषेच्या सानिध्यात आपण राहतो, वाढतो, त्या भाषेला मातृभाषा म्हणतात. युनायटेड नेशन्स-युएनच्या अहवालानुसार जगभरात बोलल्या जाणाऱ्या ६००० भाषांपैकी जवळपास २६८० भाषा- ४३ टक्के लुप्त होत आहेत. लुप्त होण्याचे प्रमाण खूप जास्त आणि वेगवान आहे. प्रत्येक महिन्याला सरासरी दोन भाषा नाहीशा होत आहेत. त्यामुळे प्रादेशिक सांस्कृतिक आणि बौद्धिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. डिजिटल क्रांतीत मागे पडलेल्या छोट्या भाषा त्यांचे अस्तित्व वाचवू शकलेल्या नाहीत. डिजिटल प्लॅटफॉर्मवर शंभरहून कमी भाषा वापरल्या जातात.

जागतिक स्तरावर, लहान देशांच्या मातृभाषा वेगवेगळ्या प्रदेशात प्रचलित आहेत. जागतिक डेटा माहितीनुसार, भारताची अधिकृत भाषा असण्यासोबतच, सात देशांमध्ये मातृभाषा म्हणून हिंदीला प्रमुख स्थान आहे. यामध्ये फिजी, न्यूझीलंड, जमैका, सिंगापूर, त्रिनिदाद टोबॅगो, मॉरिशस इ.देशातही या भाषा आहेत. पापुआ न्यू गिनी सारखे क्षेत्र उच्च भाषिक विविधतेची उदाहरणे आहेत. ३.९ दशलक्ष लोकसंख्येद्वारे येथे बोलल्या जाणार्या भाषांची संख्या सुमारे ८३२ आहे. या भाषा ४० ते ५० भिन्न भाषा कुटुंबातील आहेत. जगातील सुमारे ६० टक्के लोक फक्त ३० प्रमुख भाषा बोलतात.

भारतासारख्या विशाल बहुभाषिक देशात १९,५६९ भाषा किंवा बोली मातृभाषा म्हणून बोलल्या जातात. १२१ कोटी लोकसंख्येच्या भारतात १२१ भाषा अशा आहेत, ज्या १०,००० किंवा त्याहून अधिक लोक बोलतात. संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या २२ भाषा या भारतातील ९३.७१ टक्के लोकांच्या मातृभाषा आहेत. भारतातील ९० टक्के भाषा बोलणाऱ्यांची संख्या एक लाखापेक्षा कमी आहे. १३६५ मातृभाषांपैकी बहुतेक प्रादेशिक भाषा आहेत. भारत हा प्राचीन काळापासून बहुभाषिक देश आहे, पण ही संस्कृतीही आता धोक्यात आली आहे. भारतातील ४३ कोटी हिंदी भाषकांपैकी केवळ १२ टक्के लोक द्विभाषिक आहेत, तर ९७ दशलक्ष लोकांपैकी १८ टक्के लोक बंगाली आहेत. देशात राष्ट्रवादाच्या नावाखाली लढणाऱ्या वर्गाला संस्कृत ही केवळ १४ हजार लोकांची मातृभाषा आहे, हे जाणून आश्चर्य वाटेल. डिजिटल युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण अजूनही प्रयत्न केले नाहीत, तर कदाचित २२ अनुसूचित भाषाही त्यांचे अस्तित्व वाचवू शकणार नाहीत. आपल्या मातृभाषेत बोलायला इथले लोक टाळतात, हे भारताचे दुर्दैव आहे. जर कोणी मातृभाषेत बोलले तर त्याला अडाणी समजले जाते, त्याच्या कौशल्याचा अवमान केला जातो. इंग्रजी मानसिकतेने भाषेला सामाजिक स्थितीशी जोडले आहे. जर आपण आपल्या मातृभाषेचे संवर्धन केले नाही तर भाषिक विविधता आपसूकच नाहीशी होईल.

भारतासारख्या देशात मातृभाषा आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांची अभ्यासाची भाषा एक नसल्यामुळे शिक्षण घेणे अनेकदा आव्हानात्मक होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शाश्वत विकास उद्दिष्टे या दोन्हींचे उद्दिष्ट सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण आणि आजीवन शिक्षण उपलब्ध करून देणे हे आहे. मातृभाषेवर आधारित बहुभाषिक शिक्षणातूनच दर्जेदार शिक्षण आणि एसडीजीएस मिळू शकतात. यासाठी मुलाचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ही तरतूद करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच न्यायालयीन कामकाज आणि संबंधित निर्णयांमध्येही स्थानिक भाषा वापरण्याची गरज आहे. उच्च आणि तांत्रिक शिक्षणात स्थानिक भाषांचा वापर हळूहळू वाढवणे हे देखील या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. जानेवारी २०२२मध्ये मध्य प्रदेश सरकारने राज्यात वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण हिंदी माध्यमातून घेण्याचा निर्णयही घेतला आहे. यासोबतच प्रत्येकाने आपल्या घरात मातृभाषेच्या वापराचा अभिमान बाळगून प्राधान्य दिले पाहिजे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मातृभाषेतून शिक्षण सुरू आहे. बहुभाषिक समाजासाठी सरकारने नॅशनल ट्रान्सलेशन मिशन, भारतवाणी प्रकल्प अशा योजनाही बनवल्या आहेत.

!! आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस चिरायू होवो !!

**– संकलन व शब्दांकन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

**स्वेरीत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी**

**इतिहास तज्ञ प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची राज्याबरोबरच देशाला गरज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तुत्वातून कणखर नेतृत्व, उत्तम व्यवस्थापन, सहिष्णूता, आत्मविश्वास, आदर्श टीम वर्क, दूरदृष्टी, वेळेचे अचूक व्यवस्थापन, गुणग्राहकता, लोकपालकत्व, दूरदर्शी विचार, संकट प्रसंगी संयमाने निर्णय, स्त्रियांचा सन्मान, उत्कृष्ट योद्धा, आदर्श शासनकर्ता असे विविध गुण डोकावतात. या गुणांमुळे छत्रपतींनी अवघा महाराष्ट्र घडविला म्हणून आता राज्याबरोबरच देशाला महाराजांच्या विचारांची गरज आहे.' असे प्रतिपादन इतिहास तज्ञ प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मध्यवर्ती असलेल्या भव्य ओपन एअर थिएटरमध्ये आयोजिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास तज्ञ प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण हे आपले विचार मांडत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा व शिक्षण तज्ञ, गुजरात केंद्रीय विद्यापीठाच्या राष्ट्रपती प्रतिनिधी प्रा. डॉ. गीता नायक ह्या होत्या. महाराष्ट्र गीत, स्वेरी गीत, शिवआरती व शिवमुर्ती पुजनानंतर प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे म्हणाले, 'इंजिनिअर आणि फार्मासिस्ट बनत असताना सर्वप्रथम देशाचे जबाबदार नागरिक बनले पाहिजे. महाराजांचे आदर्श विचार हा व्यक्तिमत्वाचा भाग बनवून विद्यार्थ्यांनी लेखणी व कागद हातात घेतले पाहिजेत. २१ व्या शतकात तंत्रज्ञान हातात घेऊन तंत्रज्ञान व संशोधन विकसित करून मार्केटमध्ये यशस्वीपणे उतरले पाहिजे तरच आपल्या कुटुंबाबरोबर देशाच्या विकासात भर पडेल आणि आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले 'विकसित भारत-२०४७' हे पूर्णत्वाला येईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही प्रसंगी भावनिकतेला कुठेही थारा दिला नाही. आपल्याला यशस्वी जीवन जगायचे असेल तर त्यांच्या विचारांचा ठेवा आपण जपला पाहिजे.' असे सांगून महाराजांच्या कार्यावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे डॉ. चव्हाण पुढे म्हणाले की, 'शिवजयंतीच्या निमित्ताने ढोल ताशांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक कृतीचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे. महाराजांचे विविध पराक्रम अद्भुत आणि अविश्वसनीय आहेत. शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासताना कर्तुत्व ही ईश्वरी देणगी नसून राजांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आपल्या कृतीतून ते सिद्ध केले आहे. म्हणून महाराजांच्या कर्तुत्वाचा अभिमान वाटतो. महाराजांच्या विविध कृतीतून असे अनेक पैलू स्पष्ट दिसतात. महाराजांचे वेगळेपण यात आहे की तत्कालीन शासक आणि रयत ज्या गोष्टींची कल्पना करत नसत ती बाब शिवाजी महाराज अमलात आणत असत. प्रत्येक घटनेकडे सकारात्मक पाहण्याची दृष्टी महाराजांची होती. 'शिक्षा आणि अनुग्रह' दोन्ही गोष्टी करता येतात तेव्हाच राजा मोठा होतो. कारण रयतेच्या भाजीच्या देठाला सुद्धा हात लावता कामा नये हा आदेश छत्रपती शिवाजी महाराज देतात तेंव्हा त्यांच्यातील रयतेविषयी असलेली जागरूकता दिसून येते. राजांच्या या सुव्यवस्थित प्रशासनामुळे समाजात शेतकऱ्यांना सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. म्हणून राजांची 'प्रशासकीय व्यवस्था' अत्यंत महत्त्वाची वाटते. म्हणून महाराजांचे कितीही पारायण केले तरी ते कमी आहे यासाठी 'शिवचरित्र' वाचण्यापेक्षा ते समजून घेणे व जाणून घेणे हे महत्त्वाचे आहे.' असे सांगून राजांच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. यावेळी विद्यार्थी तन्मय भोसले, प्रगती बागल व इतर विद्यार्थ्यांनी शिवरायांची महती सांगणारी भाषणे केली तर सुरज भोसले यांनी उत्तम पोवाडा सादर केला. यावेळी विविध क्रीडा प्रकारात यश मिळवलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी सौ. चव्हाण, पंढरपूर विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. संजय मुजमुले, स्वेरीच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस.कागदे, सचिव डॉ. सुरज रोंगे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, इंजिनिअरिंगच्या स्टुडंट कौन्सिलच्या सचिवा नेहा झिरपे, डिप्लोमाच्या वैष्णवी नवले, संस्थेअंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थित होते. तनिशा लांडगे व प्रणिता व्यवहारे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.यशपाल खेडकर यांनी शिवजयंतीच्या निमित्ताने शहाजी महाराजांच्या कार्यकर्तुत्वावर प्रकाश टाकत आभार मानले.

मुख्य प्रवेश द्वाराजवळ महाराजांची भव्यमूर्ती, आकर्षक रांगोळे, भगवे फेटे परिधान करून केलेले लेझीम नृत्य आणि आकर्षक सजविलेली पालकी सोहळा ही बाब लक्ष वेधून घेत होती..

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यस्तरीय संपामुळे भूमि अभिलेख विभागाचे कामकाज ठप्प!

## भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा यांनी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रातील सर्व भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी संपावर गेले आ-हेत, त्यामुळे या संपाचा महाराष्ट्रातील भूमि अभिलेख विभागाशी संबंधित काम ावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडल्याचे दिसून येत आहे .

भूमि अभिलेख च्या इतिहासात राज्यातील सर्व भूमि अभिलेख चे कर्मचारी भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती

**भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा येथील सर्व कर्मचारी संपात सहभागी**

महाराष्ट्र राज्य च्या एकाच छताखाली आले असून यातून कर्मचाऱ्यांची ताकद एकटवल्याचे दिसून येत आहे. भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक हे विभागाचे कणा मानले जातात. जमिनीची मोजणी करण्यापासून ते शासकीय दस्-तऐवज अद्ययावत ठेवण्यापर्यंत त्यांची कामे अत्यंत तांत्रिक आणि महत्त्वाची असतात.

कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली असून ती पुढीलप्रमाणे,

१८ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून काळ्या फिती लावून कामकाज करणार आहेत,

२० फेब्रुवारी २०२६ पासून मोजणी काम बंद

२३ ते २६ फेब्रुवारीदरम्यान सामूहिक रजा , २७ फेब्रुवारी रोजी पुण्यात जम ाबंदी आयुक्त कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे .

मागण्या मान्य न झाल्यास २ म ार्चपासून संपूर्ण राज्यात बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

आज निवेदन देताना भूमि अभिलेख कार्यालय देऊळगाव राजा येथील मुख्यालय सहायक राहुल खेडकर, शिर-स्तेदार हेमंत देशपांडे, शिरस्तेदार वसंत सानप, निमतनदार प्रसाद पांडे, भुकरम ापक रमेश शिंदे, राजेंद्र गहेराव, योगेश कांबळे, शशिकांत इंगळे, अनिकेत राठी, श्रीमती ज्योती इंगळे इत्यादी उपस्थित होते.



# न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी म हाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, पालखेड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन ज्ञानेश्वर जाधव, माजी मुख्याध्यापक दत्ताराम थेटे विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक शेळके आदी व्यासपीठावर होते.

यावेळी उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांची, तसेच राजमाता जिजाऊ, मावळे अशा भूमिका,पोवाडे, छत्रपतींच्या जीवनावर नृत्ये सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शिक्षकांनी आपल्या मनोगतातून शिवाजी महाराजांचे जीवन कार्य व मौलिक विचार समजावून सांगितले.तसेच मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी छत्रपती शिवरायांचे गुण, आदर्श जीवन आपल्या जीवनात आणून आ-पले ध्येय प्राप्त करावे असे सांगितले. यावेळी कलाशिक्षक निलेश गवांदे यांनी शिवजयंतीचे विशेष व आकर्षक फलक लेखन करुन शिवमुद्रा हुबेहूब रेखाटली होती.

याप्रसंगी निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी केले.

# गादेगावचे सुपुत्र डॉ. सुजय बागल यांचा उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्री नागेश फाटे यांच्याकडून सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गादेगाव/प्रतिनिधी : गादेगाव चे सुपुत्र सुजय संजय बागल यांनी वैद्यकीय क्षेत्रा-तील चइडड ही पदवी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल, त्यांचा गादेगाव येथे भव्य सत्कार करण्यात आला. हा सोहळा उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्री. नागेश फाटे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. डॉ. संजय बागल यांचे ते सुपुत्र आहेत.

एका सामान्य ग्रामीण पार्श्वभूमीतून जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षणाचे शिखर सर केल्याबद्दल डॉ. सुजय बागल यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाला गादेगावम धील प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान बोलताना आयोजक नागेश फाटे म्हणाले की, डॉ. सुजय यांनी मिळवलेले हे यश केवळ बागल कुटुंबासाठीच नाही, तर संपूर्ण गादेगावसाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या या यशामुळे गावातील इतर विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणाची प्रेरणा मिळेल.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुजय यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना डॉ. सुजय बागल यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि गावकऱ्यांच्या प्रेमाला दिले. या सोहळ्यामुळे गावात आनंदाचे वाता-वरण पसरले असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा पंढरपुरात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पंढरपूर या संस्थेचा द्वितीय वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संस्थेच्या कार्यालयात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे चेअरमन श्री. ना-गेश फाटे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या दोन वर्षांत संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेत, सभासदांच्या विश्वासार्हतेमुळेच हे यश साध्य झाल्याचे श्री. फाटे यांनी यावेळी नमूद केले.



याप्रसंगी व्हा. चेअरमन श्री. अण्णा यशवंत नागटिळक, डॉ. रमेश फाटे, श्री हणमंत काळे,श्री. उमेश फाटे, श्री अर्जुन सावंत, श्री. बाळासाहेब बागल,श्री. अभिमन्यू पवार ,श्री ओंकार फाटे,औदुंबर कांबळे, श्री. औदुंबर माने, श्री.संजय पवार,श्री शिवाजी रणदिवे,श्री गोरख बागल, श्री श्रीराम तांदळे, श्री शशिकांत बागल, श्री शांतीनाथ बागल, श्री संजय बागल, श्री समाधान सुभाष फाटे, श्री बाळासो फाटे, मॅनेजर संग्राम कापसे, श्री. विनय शिंदे, सौ. स्वप्नाली घोडके, सौ. हर्षा सुतार, श्री. सुमित बागल, श्री. योगेश फाटे, श्री. निवृत्ती भटकर, श्री. ज्ञानेश्वर पवार, श्री. श्रीधर पिसे आणि श्री. शरद थिटे. हे मान्यवर उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. कार्यक्रम ाचे नेटके नियोजन मॅनेजर संग्राम कापसे व कर्मचारी वृंदाने केले होते. या सोहळ्याला हितचिं-तक व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा ि दल्या.

# देवराज पाटील यांची नागेश फाटे यांच्या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट; जंगी स्वागत व सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सांगली जिल्हाध्यक्ष श्री. देवराज पाटील साहेब यांनी पक्षाचे उद्योग व व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या संपर्क कार्यालयाला नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

औचित्य आणि सत्कार नागेश फाटे यांच्या संपर्क कार्यालयाला भेट दिल्यानंतर, जिल्हाध्यक्ष देवर-ाज पाटील यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी नागेश फाटे यांच्या हस्ते पाटील यांचा हार, शाल आणि पारंपरिक फेटा बांधून विशेष सन्मान करण्यात आला. पक्षसंघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आणि आगामी काळातील उद्योजकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी ही भेट महत्त्व-पूर्ण मानली जात आहे.

सांगली जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी व्यापारी आणि उद्योजकांना मोठ्या संख्येने जोडून घेणे. जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रातील अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रदेशाध्यक्ष स्तरावर पाठपुरावा करणे. शरदचंद्र पवार साहेबांचे विचार तळागाळातील व्यापार वर्गापर्यंतपोहोचवण्यासाठी राबवायचे उपक्रम.

प क्षा चा या बळकटीसाठी जिल्हाध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष यांच्यातील हा समन्वय जिल्ह्यासाठी दिशादर्शक ठरेल, अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी श्री संजय सोनटक्के, माजी डेप्युटी सरपंच श्री दाजी गावडे, माजी डेप्युटी सरपंच श्री शशिकांत डबाने, श्री हणमंतराव मिसाळ.,श्री रमेश फाटे, श्री शर्विन फाटे, श्री अभिमन्यू पवार, श्री संग्राम कापसे, श्री. विनय शिंदे, सौ. स्वप्नाली घोडके, सौ. हर्षा सुतार, श्री. सुमित बागल, श्री. योगेश फाटे, श्री. निवृत्ती भटकर, श्री. ज्ञानेश्वर पवार, श्री. श्रीधर पिसे आणि श्री. शरद थिटे. हे मान्यवर उपस्थित होते.

# नळदुर्ग येथे डॉआंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनस-ोडे : छत्रपती शिवाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे संस्थापक व आदर्श राजे होते स्वातंत्र्याची ज्योत पेटवून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे थोर विचारवंत भारत भूमीला अभिमान वाटणारे भारताचे दैवत रयतेचे राजे बहुजन प्रतिपालक श्रीमंत राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांनी तलवार चालविणे भालाफेक , दांडपट्टा खे-ळणे घोड्यावर स्वार होणे यासारख्या शिक्षणात छत्रपती शिवाजी महाराज होते आपल्या सर्व मावळ्यांना एकत्र करून मावळ्याचे नेतृत्व केले आणि हिंदवी स्वराज्य स्थापना केले सर्व म ावळ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना साथ दिली छत्रपती शिवाजी महाराज पुर्णपणे देशभक्त बलवान बलाढ्य नेतृत्व संघटन कौशल्य समता आणि सम ानता प्रस्थापित करत सर्व धर्माला सोबत घेऊन अवघ्या पंधराव्या वर्षी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली , आणि गनिमी कावा तंत्राचा वापर करून अनेक गडकिल्ले जिंकले शक्तीपेक्षा युक्ती महत्त्वाची म्हणून बलाढ्य शत्रूचा पराभव करण्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज कुठेही कमी पडले नाहीत त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत आपण त्यांचा विचार प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत आणि विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचायला हवा असे प्रतिपादन डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चे मुख्य प्रवर्तक संस्थापक तथा नळदुर्ग नगर परिषदेचे राष्ट्रीय काँग्रेस गटनेते मारुती खारवे यांनी केले .



प्रथमता छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा पुष्प पूजन करण्यात आले .

कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका कविता शिवलिंगराव देशमुख ह्या होत्या तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे पालक प्रतिनिधी सामाजिक कार्यकर्त्या वैशाली डुकरे , सोना-ली मोटे , बाळू आमले , डॉ संतोष कलकोटे हे होते उपस्थित असलेल्या पाहुण्यांच्या प्रमुख आंतरराष्ट्रीय ओलीम्पेड एस ओ एफ स्पर्धा परीक्षाम ध्ये यश संपादन केलेल्या व आय ई ओ परिक्षेत सुवर्णपदक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला ही परीक्षा संपूर्ण विश्वामध्ये एकाच दिवशी एकाच वेळेत घेतली जाते त्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले यावेळी आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने करण्यात आले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यात आले .

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खालील सहशिक्षिका शिवाजी जाधवर ,सहशिक्षक जनक गायकवाड , सहशिक्षक अमर घोडके , सहशिक्षक आबासाहेब नरवाडे , प्रशिक्षक आत्री प्रसाद शमिना खतीब , सलमा शेख , रेश्मा सुरवसे , दीपिका स्वामी , अर्पिता हंचाटे , वनीता मो-हरीर , अर्चना जमादार , रंजना घोडके , कुंभार श्वेता ज्योती बनसोडे , सुरवसे , बनसोडे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने शाळे मध्ये अनेक उपक्रम राबविण्यात आले

**सुरेखा कल्याणशेट्टी प्रशालेच्या वतीने दहावीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा**

# विद्यार्थ्यांनो आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जा, उज्वल यश मिळेल : मलकप्पा भरमशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट

विद्यार्थ्यांनो दहावीच्या परी-क्षेत यशस्वी होण्यासाठी आपण परिश्रम घेऊन अभ्यास केला आहे आता आत्म विश्वास व सकारात्मक विचाराच्या जोरावर पेपर चांगले लिहून उज्वल यश संपादन करा असा संदेश मुख्याध्यापक म लकप्पा भरमशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

अ क्क ल को ट परिसरातील विद्यार्थ्यांची महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयातील केंद्रात दहावीची परीक्षा सुरू झाली त्यावेळी परीक्षेच्या पहिल्या दिवशी मुख्याध्यापक भरमशेट्टी यांच्या हस्ते परिक्षार्थींना गुलाब पुष्प देऊन

**परीक्षेसाठी भरारी पथक व कडक बंदोबस्त**

**आजपासून सुरू होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी भरारी पथकासह पोलिसांचा कडक बंदोबस्त विद्यालयाच्या परिसरात तैनात करण्यात आला आहे असे मुख्याध्यापक भरम शेट्टी यांनी सांगितले.**



शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, दिगंबर जगताप उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, आज गुलाबपुष्प देऊन तुमचे स्वागत करताना आम्हाला अभिमान आणि आनंद वाटत आहे. गुलाबाच्या सुगंधासारखी तुमची यशाची कीर्ती दरवळो आणि त्यांच्या कोमल पाकळ्यांसारखे तुमचे स्वप्न साकार होवोत, शांत मन, एकाग्रता आणि सातत्य या त्रिसूत्रीचा अवलंब करून पेपर म ध्ये उत्तरे लिहिल्यास यश मिळते . परीक्षेची भीती न बाळगता धैर्याने प्रत्येक प्रश्नाला सामोरे जा असे ते म्हणाले.

# 'भीमा'चा श्वास गुदमरतोय!

## वाळू माफियांच्या तावडीत नदीचे अस्तित्व धोक्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर ,मंगळवेढा, मोहोळ तालुक्याची जीवन वाहिनी असलेल्या भीमा नदीचे अस्तित्वच आज धोक्यात आले असल्याचा गंभीर आरोप होत आहे. पर्यावरणाचा समतोल होल वाढत असताना नदीपत्रात छिन्नविच्छिन्न करण्यात येत असून, भविष्यात पाणीपुरवठा योजना व शेती समोरील पाणीटंचाईची भीषण समस्या उभे राहणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. टेंडरच्या नावाखाली बेसुमार वाळू उपसा? टेंडर हवा जावे आणि बेका इथे बाळू उपसा केला जात आहे नियोजन उल्लंघन करून नदीपत्रात पोखलाने व जेसीबी आणि डंपरच्या साह्याने मोठ्या प्रमाणात वाळू काढली जात आहे या प्रकारामुळे नदीचे नैसर्गिक पात्र खून उतर होत असून जलसाठा कमी होण्याचा धोका वाढला आहे.



स्थानिक नागरिकांचे मते, रात्रीच्या वेळी ही मोठ्या प्रमाणावर वाळू वाहतूक सुरू असते. यामध्ये काही मोठे मासे, सामील असल्याने संबंधित अधिकारी चे हात बांधले जात आहेत, असा आरोप होत असे बंधारे रिकामे करून वाळू उपसा?

भीमा नदीवरील काही बंधारे येथील पाणी आणि उन्हाळ्यात खाली सोडून देऊन बंधारे रिकामी केले जात असल्याचे आरोप समोर आला आहेत. यामागे वाळू उपसा सुलभ करण्याच्या उद्देश असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी उन्हाळ्यात पाण्याची पातळी अधिकच खलावती आणि पिण्याच्या पाण्याची योजना तसेच शेतीचिंचनावर परिणाम होतो.

शेती आणि पाणीपुरवठा धोक्यात भीमा नदीवरील अवलंबून असलेल्या हजारो हेक्टर शेती क्षेत्रातील भविष्यात मोठा फटका बसू शकतो. नदीपात्रातील अतिरेकी उत्खननामुळे भूजल पातळी घसरत असून विहिरी आणि बोरला कोरड्या पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे शहर आणि ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनेलाही याचा थेट परिणाम जाणवू लागला आहे.

वाळू माफियांचे मनसुबे उधळून लावायचे असतील तर सर्वांनी एक दिलाने पुढे येणे गरजेचे आहे भीमा नदीकाठच्या परिसर वाळवंट होऊ द्यायचा नसेल तर नदीपत्रातील ओरडून खाणाऱ्यांच्या बंदोबस्त केला पाहिजे असे ठाम मत व्यक्त होत आहे.

### प्रशासन काय भूमिका घेणार?

**या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने चौकशी करून बेकायदा वाळू उपचार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे पर्यावरण संरक्षणासाठी आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे भीमा नदीच्या अस्वित्व टिकवायची किंवा वाळू माफी यांच्या हवाली करायचा हा निर्णय प्रश्न आता प्रशासन आणि जनतेसमोर उभा टाकला आहे.**

## स्वेरीमध्ये शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर, ता. पंढरपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), पंढरपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उदघाटन सोलापूरच्या वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रा.डॉ चंद्रकांत चव्हाण यांच्या हस्ते झाले. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्गाने समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी सिद्ध करत उत्साहाने सहभाग नोंदविला. या शिबिरासाठी श्री. स्वामी समर्थ ब्लड सेंटर, पंढरपूर, डॉ. हेगडेवार रक्त केंद्र, सोलापूर व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व डॉ वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर अशा ३ रक्तपेढ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. विशेष म्हणजे या उपक्रमात विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक वर्ग मिळून तब्बल ३३९ ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रासाठी अमूल्य योगदान दिले. यावेळी मान्यवरांनी रक्तदाते व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक कौतुक केले तसेच समाजहितासाठी रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांची गरज अधोरेखित केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे हे 'भव्य रक्तदान शिबिर' अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमासाठी सौ. चव्हाण, संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्यासह इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, प्रा. अविनाश मोटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, प्राध्यापक वर्ग तसेच सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

### राष्ट्रीय सेवा योजनेचा कौतुकास्पद उपक्रम

## पत्रकार कैलास ढमणे यांना 'मानद डॉक्टरेट' जाहीर; पत्रकारिता व समाजसेवेच्या कार्याचा सन्मान

**निर्भीड लेखणी आणि जनसेवेच्या व्रताची दखल; सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पत्रकारिता आणि समाजसेवेच्या माध्यमातून जन सामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणारे पत्रकार यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'मानद डॉक्टरेट' पदवी जाहीर करण्यात आली आहे. या प्रतिष्ठेच्या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला मानाची पावती मिळाली असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लवकरच विशेष समारंभात त्यांना ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कैलास ढमणे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न निर्भीडपणे मांडले आहेत. त्यांनी केवळ बातमी देण्यापुरते कार्य न करता, वंचित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या लेखणीमुळे अनेक सामाजिक प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आले असून जनतेला न्याय मिळण्यास मदत झाली आहे. मानद डॉक्टरेट जाहीर झाल्यानंतर आपली भावना व्यक्त करताना कैलास ढमणे भावूक झाले. ते म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी कोहिनूर हिऱ्यासारखा मौल्यवान आहे. माझ्या जीवनातील हा अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. ही पदवी केवळ माझी नसून, ज्या जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळाली, त्या सर्वांची आहे. कैलास ढमणे यांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत सत्य, निष्पक्षता आणि लोकहित यांना नेहमच प्राधान्य दिले. निर्भीड पत्रकारितेद्वारे त्यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक सक्षम करण्यासाठी योगदान दिले आहे. समाजसेवेच्या क्षेत्रातही त्यांनी संकटाच्या काळात गरजूंना मदत करण्याची भूमिका निभावली आहे. तसेच, प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. शून्यातून आपले स्थान निर्माण करत जनसेवेचा वसा घेतलेल्या कैलास ढमणे यांना जाहीर झालेली मानद डॉक्टरेट ही त्यांच्या दीर्घकालीन कार्याची आणि समर्पणाची पावती मानली जात आहे. त्यांच्या चाहत्यांमध्ये, मित्रपरिवारात आणि सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, एक सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकाराला मिळालेला हा सन्मान प्रेरणादायी असल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. हा सन्मान त्यांच्या कार्याची दखल घेणारा असून पत्रकारिता आणि समाजसेवेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



## भेटीचे आमिष दाखवून महिला कार्यकर्त्यावर अत्याचार केल्याचा आरोप; पडघा पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या महिला कार्यकर्त्यावर त्याच पक्षाशी संबंधित कार्यकर्त्याने अत्याचार केल्याचा गंभीर आरोप समोर आला असून या प्रकरणी पडघा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपी राकेश मोरे याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत भेट घडवून आणण्याचे आमिष दाखवून तिला विश्वासात घेतल्याचे सांगितले आहे. तक्रारीनुसार, आरोपीने संबंधित महिलेला भेटीच्या नावाखाली गाडीतून भिवंडी ग्रामीण भागातील एका लॉजवर नेले आणि तेथे तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर पीडित महिलेने पडघा पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली असून तिच्या तक्रारीच्या आधारे आरोपीविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी राकेश मोरे हा फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. तसेच घटनेचे ठिकाण, संबंधित लॉज आणि इतर पुरावे यांचा तपास करण्यात येत आहे.




दरम्यान, या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळातही चर्चेला उधाण आले आहे. संबंधित आरोपांची सत्यता तपासण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून अधिकृत तपास अहवालानंतरच घटनेचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## अखिल भारतीय मराठा महासंघ पंढरपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय मराठा महासंघ पंढरपूर शहर व तालुका यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी महाराजांच्या प्रतिनिधी पूजन सोलापूर जिल्ह्याचे आमदार प्रशांतराव परिचारक पंढरपूर मंगळवेढा तालुक्याचे आमदार समाधान दादा अवताडे, माढा तालुक्याचे आमदार अभिजीत आबा पाटील, युवा नेते प्रणव दादा परिचारक, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी परिसर शिवमय झाला होता शिवरायांच्या जयघोषाने दोन-दोनला होता याप्रसंगी सोलापूर जिल्हा परिषदेचे पंढरपूर तालुक्याचे सर्व सदस्य व पंढरपूर पंचायत समितीचे सर्व सदस्य पंढरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष उपनगरा सर्व नगरसेवक यांचा सत्कार करण्यात आला एवढी शिवजन्मोत्सव सोहळा प्रसंगी सोहळा समिती अध्यक्ष कुणाल घुले, उपाध्यक्ष शुभम ताटे, सचिव पांडुरंग शिंदे, खजिनदार सचिन गंधडे, तालुकाध्यक्ष संतोष जाधव, महापौर अनिल पवार किंवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मोरे, सातारा जिल्हाध्यक्ष हनुमंत कदम महिला जिल्हाध्यक्ष प्रभावती ताई गायकवाड जिल्हाध्यक्ष आरक्षणाताई चव्हाण राधिकाताई चव्हाण शहर उपाध्यक्ष अश्विनीताई साळुंखे शहर उपाध्यक्ष शामराव साळुंखे काका यादव उपस्थित होते, व्यापार उद्योग आघाडी नाना शिंदे युवा जिल्हा संघटक रोहित चव्हाण श्रीमंत गाजरे रिक्षा आश्रमचे अध्यक्ष यशवंत बागल वैभव चव्हाण लखन चव्हाण गणेश माने बाबा संगमनेर सावंत शकील मुलांनी विनायक पडवळे साहेब मराठा माध्यमिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पंढरपूर तालुका पोलिसांनी एकूण १३ गाईंच्या लहान वारसांना जीवदान दिले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास गोरक्षण श्री घाटे व मानस परिचारक यांनी फोन द्वारे माहिती दिली की पुळुज गावातील शारदानगर येथे चारा पाण्याविना लहान गायीची एकूण १३ वासरे एका जाळीमध्ये बांधलेल्या अवस्थेत आहेत व काही वेळाने ती फटकांकडे घेऊन जाणारे अशी माहिती पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री टी वाय मुजावर यांना मिळताच त्यांनी तात्काळ सदरची माहिती माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब यांना देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकासह पुळूज येथे कारवाई केली असता एका झाडाखाली एकूण लहान मोठ्या आकाराची १३ गायींची वासरे बांधलेली आढळली व त्यांना चारापाणी वगैरे काही सोयी त्या ठिकाणी केलेली नव्हती सदरची जनवारे खोडपणाने बांधून ठेवलेल्या अवस्थेत होती व खटकाकडे कत्तलीसाठी देण्याचा तयारीत असताना ती जनावारे गंगाराम साहेबराव वाघमोडे राहणार पुळूज, या व्यक्तीने बांधून ठेवण्याचे निष्पन्न झाले व सदर व्यक्तींनी ही जनावारे खटकाकडे द्यायच्या अगोदरच त्या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून एकूण १३ गाईच्या वासराचे प्राण वाचवले. गोरक्ष मानस माधव परिचारक राहणार पंढरपूर यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गंगाराम साहेबराव वाघमोडे प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांना क्रूरपणे निर्दयतेने वागणूक देणे. या कायद्याअंतर्गत तक्रार दिलेले आहे त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे पंढरपूर तालुका पोलिसांच्या या कारवाहिनी सर्व नागरिकांमध्ये कौतुक होत आहे पोलिसांनी १३ गायींच्या लहान वासरांना ताब्यात घेऊन गोशाळेमध्ये जमा केले आहेत. सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब, व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, भारत भोसले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, साहेब फौजदार विजू गायकवाड, पोलीस हवालदार दीपक भोसले, सुहास देशमुख मंगेश रोकडे, संजय गुटाळ, सागर गवळी, विजयकुमार आवटी अभिमन्यू गरड, चालक हसन नदाफ यांच्या पथकाने केली आहे.



**शिवजयंती प्रेरणादायी उत्सव - डॉ. बी. टी. जाधव**

**कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात**

# जाणता राजा म्हणून शिवाजी महाराजांचे कार्य अद्वितीय : डॉ. विकास कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : छत्रपती शिवाजी महाराजांसारखा लोकाभिमुख राजा इतिहासात झाला नाही आणि भविष्यात होणे कठीण आहे. जाणता राजा, रयतेचा राजा, धर्मसहिष्णू राजा अशा उपाध्यांतून त्यांच्या कार्याची महानता अधोरेखित होते. सतराव्या शतकात इस्लामी सत्तेच्या प्राबल्याच्या काळात जनतेवर होणारा अन्याय, अत्याचार व शोषण दूर करण्यासाठी त्यांनी स्वराज्याचे व्रत स्वीकारले. राजा हा प्रजेचा मालक नसून सेवक असतो, ही भूमिका स्वीकारून महाराजांनी जनतेची आयुष्यभर सेवा करण्याचा ध्यास घेतला. असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. विकास कदम यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, इतिहास विभाग व समारंभ समिती यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीति' या विषयावर प्रा. डॉ. विकास कदम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.

डॉ. विकास कदम पुढे म्हणाले की, महाराजांनी व्यक्तिगत व राजकीय जीवनात डामडौल न करता न्यायनिष्ठा व सेवाभाव जोपासला. स्वराज्यनिष्ठ मावळे व रयत घडवून युवकांमध्ये धाडस, दूरदृष्टी व प्रेरणा निर्माण केली. नवीन प्रदेश जिंकताना तेथील जनतेचा विश्वास संपादन करून सामाजिक समता व कर्तृत्वाला महत्त्व दिले. धर्मगुरू व फकीरांचा आदर करून समाजाची नैतिकता व वैचारिक अधिष्ठान उंचावले. चुकीच्या रूढी-परंपरांना आळा घालण्यासाठी त्यांनी कृतीतून आदर्श घालून दिला. शहाजीराजांच्या निधनानंतर सती जाणाऱ्या जिजाऊंना रोखणे, स्त्रियांचा सन्मान राखणे, निष्कलंक चारित्र्य राखणे ही त्यांची वैशिष्ट्ये होती. मराठ्यांना आपलेसे करण्यासाठी आठ विवाह केले; मात्र इतर राजांसारखा जनानखाना ठेवला नाही. धर्माचा वापर प्रतिष्ठा वाढवण्यासाठी किंवा छळासाठी न करता त्यांनी धर्मसहिष्णुतेची भूमिका स्वीकारली. मुठभर मावळ्यांच्या बळावर बलाढ्य इस्लामी सत्तांना शह देत जनतेच्या विश्वासावर आधारित वैचारिक बैठक निर्माण केली.





अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव म्हणाले की, शिवजयंती हा प्रेरणा देणारा उत्सव असून देशात व विदेशात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. या निमित्ताने अभ्यासू व्यक्तींची व्याख्याने आयोजित करून ऐतिहासिक दस्तऐवज व पुराव्यांच्या आधारे सत्य इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. शिवाजी महाराजांच्या इतिहासातून वर्तमानासाठी धडे घेऊन भविष्यात त्याचा उपयोग करणे गरजेचे असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण आत्मसात करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करावे.

कार्यक्रमास कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य तथा अधिष्ठाता डॉ. सुशीलकुमार शिंदे, अधिष्ठाता समाधान माने, पदवीधर पदवी वर्गाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, विज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व इतिहास विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. भारती सुडके यांनी केले. या कार्यक्रमास सीनियर, ज्युनियर व व्होकेशनल विभागातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी समारंभ समितीचे चेअरमन प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी आभार मानले.